मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » बुधवार, दि. 7 ऑगस्ट 2024 | पान- 1

# रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे काम युद्धपातळीवर सुरु

## एकूण 32 रस्ते दुरूस्ती पथक नेमण्यात आले : आयुक्त सिंह स्वतः परिस्थितीचा आढावा घेत आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील विविध रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालय स्तरावर 4 असे एकूण 32 रस्ते दुरुस्ती पथक नेमण्यात आले आहेत. तसेच शहरातील रस्ते दुरुस्तीची कार्य युद्धपातळीवर सुरु असल्याची माहिती क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी दिली असून आयुक्त सिंह स्वतः परिस्थितीचा आढावा घेत आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील विद्यार्थ्यांना महापालिकेच्या हद्दीबाहेरील कार्यक्षेत्रामध्ये शिक्षण घेण्यासाठी सवलतीच्या दरात पास उपलब्ध करून देणारी योजना राबविण्यासाठीच्या विषयासह विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी प्रशासकीय मान्यता दिली. महापालिका सभा आणि स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असलेले विविध विषय मान्यतेसाठी विशेष बैठकीमध्ये ठेवण्यात आले होते. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त तथा नगरसचिव चंद्रकांत इंदलकर तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.

महापालिकेच्या हद्दीत राहणाऱ्या व महापालिकेच्या हद्दीबाहेर शिक्षण घेणाऱ्या इयत्ता 5 वी ते 10 वी च्या विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात पीएमपीएमएल बसचे पास उपलब्ध करून देण्यात येणारी योजना महापालिकेच्या वतीने राबविण्यात येत आहे. या योजनेच्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चास प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या बैठकीत मान्यता दिली. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांच्या पाससाठी आकारण्यात येणाऱ्या रक्कमेच्या 75 % रक्कम महापालिका भरणार असून विद्यार्थ्यांना 25 % रक्कम पाससाठी भरावी लागणार आहे.




### पूरपरिस्थिती नंतर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा

» बैठकित आयुक्त शेखर सिंह यांनी शहरातील नद्यांना आलेल्या पूर परिस्थिती नंतर क्षेत्रीय कार्यालयस्तरावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घेतला. पूर ओसरल्यानंतर पुरबाधित परिसरात तातडीने स्वच्छता करण्यात आली असून, रहिवासी भागात असलेले गाळ धुवून काढण्यात आले आहे. शहरातील रस्त्यांवर साचलेले गाळ, केरकचरा काढण्यात आले असून पदपथ, स्मशानभूमी, विसर्जन घाट आदी ठिकाणी स्वच्छता करण्यात आली आहे.

### विशेष बैठकीत मंजूर विषय

» 10 वी 12 वी च्या मुलींना मोफत डिप्लोमा कोर्सेस उपलब्ध करून देणे, मौजे मोशी मधील पुणे नाशिक रस्ता टते वडमुखवाडी शिवेपर्यंतचा 90 मीटर रुंद रस्त्याने बाधित जमिनीचे भूसंपादन करणे, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या इंडस्ट्रीयल स्पोर्ट्स असोसिएशन शुटींगबॉल स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंना साहित्य पुरविणे, सर्व्हे नंबर 20 आणि 96 येथील शुद्ध पाणीपुरवठा करणाऱ्या पंपहाऊसचे दुरुस्तीविषयक कामे करणे, विविध भागात खोदण्यात आलेल्या चर बुजविणे, विविध भागातील रस्ते, नाले, प्रकल्प तसेच शहरातील विविध ठिकाणच्या देखभाल व दुरुस्तीच्या आदी विषयांना प्रशासक सिंह यांनी झालेल्या बैठकीत मान्यता दिली.

---

# सोसायटीतील झाडे काढण्यासाठी महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडून रहिवाशांवर दबाव

## पिंपरीतील महिंद्रा सेन्ट्रलिस सहकारी गृहरचना संस्थेच्या आवारातील 25 ते 30 देशी झाडे काढण्यासाठी रहिवाशांवर दबाव टाकला जात आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरीतील महिंद्रा सेन्ट्रलिस सहकारी गृहरचना संस्थेच्या आवारातील २५ ते ३० देशी झाडे काढण्यासाठी महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडून सोसायटीतील रहिवाशांवर दबाव टाकला जात आहे. मात्र, आमच्या सोसायटी आवारातील एकही झाड काढण्यात येऊ नये, याकरिता सोसायटीतील रहिवासी आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत. त्यामुळे महापालिका एकीकडे शहरात वृक्ष लागवडीवर करोडो रुपये खर्च करते. मात्र, सोसायटी आवारातील झाडे काढण्यासाठी राजकीय दबावाखाली येत एका वरिष्ठ अधिकाऱ्याकडून झाडे काढण्यास सोसायटीतील रहिवाशांवर दबाव टाकला जात आहे.



पिंपरीतील आंबेडकर चौकात महिंद्रा लाइफस्पेस डेव्हलपर्सकडून महिंद्रा सेन्ट्रलिस गृहप्रकल्प उभारण्यात आला आहे. महिंद्रा सेन्ट्रलिस सोसायटी परिसरात विकासकाने हरित पट्टा करून दिला आहे. महापालिकेने ई मेलद्वारे विकासकाला कळवून सोसायटीतील झाडे (हरित पट्टा) काढून टाकण्याची कारवाई करणार असल्याचे कळवले. महापालिकेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने राजकीय नेत्यांच्या दबावाखाली येत महिंद्रा सोसायटीच्या आवारातील २५ ते ३० देशी प्रकारची झाडे काढण्याची तयारी सुरू केली आहे, पण संबंधित विकासकाने महापालिकेचे बांधकाम परवानगी घेऊन केलेले आहे. सोसायटीचा महापालिकेने भोगवटा दाखला देखील दिलेला आहे.

### दोघांच्या वादात पालिकेने पडू नये

» आमची सोसायटी आणि म्हाडा सोसायटीमधील काही वाद असतील त्यात महापालिकेने लक्ष घालू नये. जर दोन वर्षांपूर्वी महापालिकेने सोसायटीला एनओसी दिली आहे, तर त्यानंतर सोसायटीतील झाडे लावून हरित करण्याचे कामे सोसायटीचे आहे. त्यामुळे महापालिकेने यामध्ये हस्तक्षेप करू नये. तसेच सदर ड्राईव्ह वे जर आपण म्हणत असाल तर तिथे पार्किंग का दिली आहे? अशा प्रकारच्या दोन सोसायटींमध्ये महापालिकेने लक्ष घालू नये, अशी देखील पत्रकाद्वारे विनंती महिंद्रा सेन्ट्रलिस सोसायटीकडून केली आहे.

### सेफ्टी फेन्सिंग कंपाऊंड करून द्यावे

» चोरी, गुन्हेगारी, भांडण, मारामारी अशा अनेक घटनांना सोसायटीला तोंड द्यावे लागेल. त्यामुळे महापालिकेने हरित पट्टा काढू नये व त्या ठिकाणी सेफ्टी फेन्सिंग कंपाऊंड करून द्यावे, अशी मागणी लेखी पत्रकाद्वारे सोसायटीतील नागरिकांनी केली आहे. आहे.

# मुख्यमंत्र्यांचा दौरा... वाहतूक कोंडीतून एक दिवसाचा दिलासा!

## मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यावेळी वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पोलिसांची दमछाक, चौकाचौकात वाहतूक पोलिसांसह 'खाकी वर्दी'ही लागली कामाला

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील शिवाजीनगरच्या पाटील इस्टेट, सिंहगड रस्त्यावरील एकतानगरी आणि सांगवी पूरग्रस्त भागातील बाधित नागरिकांच्या भेटीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोमवारी (दि. ५) पुण्यात आले होते. यावेळी वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पोलिसांची चांगलीच दमछाक झाली. मुख्यमंत्र्यांच्या या दौऱ्यामुळे काही काळासाठी का होईना पुणेकरांना सुरळीत वाहतुकीचा सुखद अनुभव मात्र घेता आला.

मुख्यमंत्री पुणे दौऱ्यावर येणार असल्याने महापालिका आणि पोलिसांसह जिल्हा प्रशासनाची यंत्रणा अगदी युद्धपातळीवर कामाला लागली होती. शहरातील रस्त्यांवर पडलेले खड्डे, तुटलेले दुभाजक दुरुस्त करण्याचे काम तत्काळ सुरू करण्यात आले. सुदैवाने पावसाने उघडीप दिल्याने पालिका प्रशासनाने खड्ड्यांचे 'ठिगळ काम' उरकून घेतले. एरवी वाहतूक कोंडीमुळे पुणेकरांचा जीव टांगणीला लागलेला असतो. चौकांमध्ये वाहतूक पोलिसांचा पत्ता नसतो. अशा स्थितीत मुख्यमंत्री पुण्यात येणार म्हटल्यावर शहरातील महत्त्वाच्या आणि त्यातही मुख्यमंत्री ज्या मार्गाने जाणार त्या रस्त्यावर वाहतूक पोलीस अवतरले. वाहनचालक त्यांना किती जुमानतात हे सर्वश्रुत असल्याने त्यांच्या जोडीला स्थानिक पोलीस ठाणे आणि मुख्यालयातील खाकी वर्दीमधील पोलिसांची कुमक देण्यात आली. त्यामुळे चौकाचौकात खाकी वर्दीमधले पोलीस दिसत होते.

पावसामुळे धरणक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पाऊस सुरू आहे. त्यामुळे धरणे भरली आहेत. सुरक्षेच्या कारणास्तव मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग करण्यात आला होता. त्यामुळे सिंहगड रस्ता भागातील एकतानगरी, विठ्ठलनगर या भागात पुराच्या पाण्यामुळे शेकडो कुटुंब बाधीत झाली होती. त्यांची भेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी घेतली. मुख्यमंत्र्यांचा ताफा ज्या मार्गाने जाणार होता त्या मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये सिंहगड रस्त्याला अक्षरशः पोलीस छावणीचे स्वरूप प्राप्त झाले होते.



### सर्वसामान्य पुणेकरांसाठी दररोज असेच नियोजन करावे...

» याबाबत, सिंहगड रस्ता भागात राहणारे श्रीपाद देशपांडे म्हणाले, "नांदेड सिटीमध्ये मी राहतो. आम्हाला दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागतो. उड्डाणपुलाच्या कामामुळे तर वाहने संथ गतीने पुढे सरकतात. सोमवारी सकाळी कामावर निघालो तेव्हा वाहने सुसाट जात होती. रस्त्यावर कोंडी अजिबात लागली नाही. हा माझ्यासाठी आश्चर्याचा धक्का होता. हे सर्व नियोजन मुख्यमंत्री महोदयांच्या दौऱ्यासाठी करण्यात आल्याचे मला नंतर समजले." महापालिका आणि पोलीस प्रशासनाने पुणेकर नागरिकांसाठी दररोज असेच प्रयत्न केले तर वाहतूक कोंडीमधून सुटका तरी होईल, असे देशपांडे म्हणाले.

### पोलिसांची तारांबळ

» प्रत्येक चौकात दहापेक्षा जास्त पोलीस कर्मचारी तैनात ठेवण्यात आले होते. रस्त्यावर उभ्या असलेल्या दुचाकी, चारचाकी हटविण्याची कारवाई पालिका आणि पोलिसांकडून केली जात होती. अनेक वाहने क्रेनच्या साहाय्याने उचलून बाजूल करण्यात आली. मुख्यमंत्र्यांचा ताफा जसजसा सिंहगड रस्त्याच्या दिशेने जात होता तसतशी धायरीकडून राजाराम पुलाकडे जाणारी वाहतूक थांबविण्यात येत होती. एकंदरीतच मुख्यमंत्र्यांना कोणताही त्रास होऊ नये याकरिता पोलिसांची तारांबळ उडाल्याचे चित्र सोमवारी शहरात पाहायला मिळाले.

> आम्ही अनेक दिवसांपासून नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडीवर उपाय काढण्याबाबत पालिका प्रशासन आणि वाहतूक पोलिसांकडे पाठपुरावा करीत आहोत. आम्ही बीआरटी काढण्याचीदेखील मागणी केली होती. वाहनांची संख्या आणि रस्त्यांची मर्यादा पाहता दीर्घकालीन उपाययोजना करणे आवश्यक आहेच. मात्र, दैनंदिन प्रवास करणाऱ्या वाहनचालक आणि प्रवाशांना तत्काळ दिलासा देणेदेखील आवश्यक आहे. केवळ मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठीच तात्पुरती कोंडी दूर केली जाणार असेल तर हा पुणेकरांवर अन्याय आहे.
>
> - आशिष माने, सामाजिक कार्यकर्ते, वडगाव शेरी.

# टीकेचा भडिमार झाल्यानंतर महापालिकेने खड्डे 'लपविले', कामाचा दर्जा निकृष्ट

## पुन्हा एकदा जोरदार पाऊस झाल्यास दुरुस्त केलेले रस्ते पुन्हा खड्ड्यांत जाण्याची भीती केवळ दिखाऊपणाच दिसत आहे

**पुणे | प्रतिनिधी**

रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे टीकेचा भडिमार झाल्यानंतर जाग आलेल्या महापालिकेने खड्डे दुरुस्तीची मोहीम राबविली. रात्रंदिवस जागून खड्डेही बुजविले. खड्डे बुजविण्याची, खचलेल्या चेंबरभोवती डांबर टाकण्याची व पॅचवर्कची कामे मात्र निकृष्ट दर्जाची असल्याचे 'सकाळ'ने केलेल्या पाहणीत उघड झाले आहे. अनेक ठिकाणी खड्डे बुजविण्याची कामे अर्धवटच झाली आहेत. अनेक ठिकाणी दुरुस्त केलेल्या खड्ड्यांमधील खडी रस्त्यावर पसरली आहे. पॅचवर्कच्या कडाभोवतीचीही खडी निघू लागली आहे. खचलेल्या चेंबरची दुरुस्ती तर केवळ दिखाऊपणाच असल्याचे दिसत आहे. पुन्हा एकदा जोरदार पाऊस झाल्यास दुरुस्त केलेले रस्ते पुन्हा खड्ड्यांत जाण्याची भीती आहे.

पावसामुळे शहराच्या बहुतांश भागांतील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले. त्याचा परिणाम वाहतुकीवर होऊन ठिकठिकाणी कोंडीची समस्या निर्माण झाली होती. त्यानंतरही खड्डे दुरुस्तीकडे महापालिका प्रशासनाने गांभीर्याने पाहिले नाही. या प्रश्नावर 'सकाळ'ने प्रकाश टाकला. त्याची दखल घेत केंद्रीय विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी महापालिका व पोलिस प्रशासनाची बैठक घेऊन ४८ तासांत खड्डे बुजविण्याचा आदेश दिला होता. त्यानंतर महापालिकेच्या पथ विभागाने शनिवारी व रविवारी रात्रभर काम करून ८०४ खड्डे दुरुस्त केल्याचा दावा केला होता. 'सकाळ'ने शहराच्या विविध भागांतील प्रमुख रस्त्यांची मंगळवारी पाहणी केली. त्यामध्ये महापालिकेने खड्डे बुजविण्याचे काम केले, मात्र हे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे पाहणीत उघड झाले.



### 'शास्त्रीय पद्धती' नावापुरतीच

» रस्त्यावर खड्डा पडलेली जागा चौकोनी आकारात कटरच्या साहाय्याने खोदली जाते. त्यातील पाणी काढून खड्डा स्वच्छ केला जातो. त्यानंतर त्यावर डांबराची फवारणी केली जाते. पुढे उपलब्ध हॉट मिक्स किंवा कोल्ड मिक्स मटेरिअलचा वापर करून खड्डा बुजवला जातो. त्यावर रोलिंग केली जाते. त्यानंतर त्यावर पुन्हा डांबर लिक्विडची पट्टी मारली जाते. अशा शास्त्रीय पद्धतीने खड्डयांची दुरुस्ती केली जाते. प्रत्यक्षात शास्त्रीय पद्धतीने खड्डे बुजविण्याचे काम केवळ नावापुरतेच झाल्याची सद्यःस्थिती आहे.

### ठळक निरीक्षणे

- » खडी, काँक्रिट, कोल्ड मिक्सचा वापर करून खड्डे बुजविले आहेत
- » बुजविलेल्या बहुतांश खड्ड्यांमधील खडी रस्त्यावर आली आहे
- » पुन्हा त्याच ठिकाणी खड्डे तयार झाले आहेत
- » ठिकठिकाणी केलेल्या पॅचवर्कच्या कामातील खडीही बाहेर पडू लागली आहे
- » खचलेल्या चेंबरभोवती अर्धवट डांबर टाकून ते बुजविण्याचा प्रयत्न
- » काही ठिकाणी बुजविलेल्या खड्ड्यांच्या ठिकाणी पुन्हा रस्त्याची चाळण

# सोसायटीची भिंत फोडून अवैध वाहतूक

## पिंपळे सौदागर येथील रोझलँड रेसिडन्सीमधील रहिवाशांची पोलिसांत धाव : पाच महिने उलटूनही कारवाई नाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपळे सौदागर येथील रोझलँड रेसिडन्सी हौसिंग सोसायटी गेट-४ या गृहनिर्माण संस्थेच्या अंतर्गत भागातून होत असलेल्या अवैध वाहतुकीमुळे रहिवाशांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. ही वाहतूक तातडीने बंद करण्याची मागणी रहिवाशांनी केली आहे. या संदर्भात अनेकदा पोलिसांना कळवले असून, पोलीस उपायुक्त यांच्याकडे न्याय मिळण्याची मागणी केली आहे. मात्र, पाच महिने उलटूनही कोणतीही कार्यवाही केली नसल्याने रहिवाशांमध्ये तीव्र संताप आहे.



या संदर्भात सांगवी पोलीस स्टेशन येथे सोसायटी रहिवाशांनी लेखी तक्रार दिली असून होत असणाऱ्या त्रासाची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींकडेही केली असल्याचे येथील रहिवाशांनी नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले. पिंपळे सौदागर हा परिसर आयटीएन्स तसेच उच्चभ्रू रहिवासी परिसर म्हणून ओळखला जातो, याच परिसरात असणाऱ्या रोझलँड रेसिडन्सी हाउसिंग सोसायटी आहे. या सोसायटीच्या गेट- ४ या गृह संस्थेच्या खासगी क्षेत्रातून एका व्यावसायिकाने अवैधरित्या प्रवेश करून व संरक्षक भिंतीचे बांधकाम पाडले आहे. संस्थेची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता ही अवैधरित्या वाहतूक सुरू केली असल्याचे सोसायटीतील रहिवाशांचे म्हणणे आहे. रोजलँड रेसिडन्सी सोसायटीमध्ये जवळपास आठशे पन्नास सभासद असून यात जेष्ठ नागरिक व लहान मुलांचे प्रमाण मोठे आहे. या ठिकाणी साडेतीन हजार रहिवासी संख्या आहे.

सोसायटीचे बांधकाम करणाऱ्या मूळ मालकाने सोसायटीला व येथील रहिवाशांना ऑफिस, उद्यान व खासगी रस्ता अशा अनेक सुविधा दिल्या होत्या. मात्र प्रत्यक्षात या विषयी कोणासही विश्वासात न घेता व कोणत्याही प्रकारची पूर्वकल्पना न देता परस्पर वापरण्यास दिला असून, त्यामुळे अनेक अडचणींना येथील राहिवाशांना सामोरे जावे लागत आहे. याबाबत अनेक पत्रव्यवहार आणि मागण्या करून त्याची कोणतीही दखल घेतली नाही. अखेर सोसायटीच्या काही सभासदांनी पुढाकार घेऊन सांगवी पोलीस ठाणे गाठले. तसेच, पोलीस उपायुक्त यांच्याकडे देखील लक्ष घालण्याची विनंती केली होती. नुकतेच मे महिन्यात याबाबत पोलिसांना भेटून कारवाई करण्याची मागणी केली होती. मात्र अद्याप कोणतीही कारवाई झाली नसल्याचे म्हणणे आहे.

नुकत्याच पुण्यातील घडलेल्या हिट अँड रनच्या घटना व इतर अपघात घटनांमुळे रहिवाशांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण असून, या वाहतुकीमुळे भीती वाढली आहे व यामुळे अपघात होण्याची श्यक्यता नाकारता येत नाही. या संदर्भात सांगवी पोलीस स्टेशन येथे सोसायटी रहिवाशांनी लेखी तक्रार दिली असून, होत असणाऱ्या त्रासाची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींकडे दिली असल्याचे येथील रहिवाशांनी सांगितले. या संदर्भात महापालिका प्रशासन व पोलीस प्रशासनाने सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

### ज्येष्ठांच्या जागेवरून धोकादायक वाहतूक

**» सोसायटीतील अंतर्गत रस्ता हा येथील बांधकाम व्यावसायिक नियम मोडून सोसायटीच्या परिसरातून परवानगी न घेता वाळू, सिमेंट व इतर साहित्याचे ट्रक, डंपर, जेसीबी व इतर अवजड वाहनांद्वारे संरक्षक भिंत तोडून वाहतूक केली जात आहे. या बाबत सुभाष भिसे व त्यांच्या अन्य दोन मुलांविरोधात तक्रार आहे. सोसायटीमधील अंतर्गत रस्त्याच्या दोन्ही बाजूला ज्येष्ठ नागरिकांच्या बसण्याची जागा, तसेच लहान मुलांना खेळण्यासाठी जागा आहे. मात्र, या जागेच्या मध्य भागातूनच अशा प्रकारे वाहतूक केली जात असल्याने ज्येष्ठ नागरिकांचा व लहान मुलांचा जीव धोक्यात आला आहे.**

# पिंपरी चिंचवड विद्यापीठ मध्ये रेड हॅट अकादमीचा प्रारंभ

## सहभागी विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर उपयोगी असणारे प्रमाणपत्र देण्यात येणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयु) पुणे, आणि आयटी क्षेत्रातली अग्रगण्य कंपनी रेड हॅट यांच्या मध्ये नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. या करारानुसार पिंपरी चिंचवड विद्यापीठात रेड हॅट अकादमी सुरु करण्यात येणार आहे. रेड हॅट ही लिनक्स प्रणालीवर चालणारी जगातली अग्रगण्य ओपन सोर्स सोल्युशन देणारी कंपनी आहे. या करारानुसार पिंपरी चिंचवड युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांना रेड हॅटतर्फे आयटी कौशल्य विकसित करण्यासाठी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सहभागी विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर उपयोगी असणारे प्रमाणपत्र देण्यात येणार असून पीसीयु – रेड हॅट अकादमी असे नामकरण करण्यात आले आहे.



शैक्षणिक प्रशिक्षण आणि इंडस्ट्रीतील अंतर कमी करण्यासाठी पीसीयु रेड हॅट अकादमी काम करेल. आयटी क्षेत्रातील अत्याधुनिक तांत्रिक कौशल्य विकसित करून प्रत्यक्ष कार्यानुभव मिळेल. हा अभ्यासक्रम इंडस्ट्रीशी संलग्न असून अत्याधुनिक लॅब आणि प्रशिक्षक पुरवण्यात येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास होईल आणि स्पर्धात्मक क्षेत्रात नोकरीच्या अधिक संधी उपलब्ध होतील.

पीसीयु -रेड हॅट अकादमीचा व्यापक अभ्यासक्रम -

पीसीयू रेड हॅट अकादमीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना महत्वपूर्ण क्षेत्रांमध्ये अभ्यासक्रम करण्याची संधी मिळेल. कोर सिस्टम एडमिनिस्ट्रेशन, क्लाऊड कॉम्प्युटींग, मिडलवेअर डेव्हलपमेन्ट. रेड हॅट सिस्टम एडमिनिस्ट्रेशन १ आणि २ द्वारे विद्यार्थ्यांना रेड हॅट एंटरप्राईजच्या लिनक्स प्रणालीचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. क्लाऊड कंम्प्युटींग अंतर्गत रेड हॅट ओपन स्टॅक एडमिनिस्ट्रेशन आणि ओपन शिफ्ट एप्लिकेशनच्या प्रशिक्षणाद्वारे क्लाऊड स्ट्रॅटेजीचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. मिडसवेअर डेव्हलपमेंटद्वारे पायथन प्रोग्रामिंग आणि जावा इइचा समावेश करण्यात आला आहे.

जागतिक स्तरावर मागणी असलेली ओपन-सोर्स कौशल्ये प्रदान करणे, जागतिक प्रमाणपत्रांद्वारे रोजगार योग्यता वाढवणे, लवचिक, प्रत्यक्ष शिक्षण अनुभव प्रदान करणे, उच्च-गुणवत्तेचे अभ्यासक्रम सामग्री देणे ही पीसीयू-रेड हॅट अकादमीची उद्दिष्ट आहेत. विद्यापीठातर्फे आयटीक्षेत्रात करीयर करु इच्छिणाऱ्या विद्यार्थी आणि व्यावसायिकांना पीसीयु रेड हॅट अकादमीशी संलग्न होण्याचे आवाहन प्रभारी कुलगुरु डॉ. मणीमाला पुरी यांनी केले.

विद्यार्थ्यांना इंडस्ट्रीशी सुसंगत अभ्यासक्रम देण्यावर आमचा भर आहे. यातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासावर आम्ही लक्ष देत आहोत. रेड हॅटसोबत झालेल्या या सामंजस्य करामुळे पीसीयुच्या विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरचे प्रशिक्षण मिळणार आहे. विद्यार्थ्यांसाठी ही मोठी संधी असल्याचे, मत प्र-कुलगुरु डॉ. सुदीप थेपडे यांनी व्यक्त केले. कंप्युटर विभागाचे प्रमुख डॉ. व्ही. एन. पाटील व डॉ. दिलीप सैनी यांनी आगामी उपक्रमाची तयारी व संक्षिप्त सादरीकरण केले. अधिक माहितीसाठी आणि नोंदणीसाठी HTTPS://WWW.PCU.EDU.IN या संकेतस्थळाला भेट द्यावी असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

# पुणे जिल्ह्यातील तब्बल 11 मंदिरांमध्ये चोरी

## सीसीटीव्हीमुळे चोरटा पोलिसांच्या जाळ्यात : पुण्याच्या ग्रामीण भागातील घटना

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, शिरूर, शिक्रापूर , रांजणगाव, खेड भागातील मंदिरातून रक्कम चोरी होण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने पोलिसांनी तपास सुरु केला. मंदिरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासल्यानंतर एका सराईत चोरट्याने चोरी केल्याचे उघडकीस आल्यानंतर शिक्रापूर परिसरात त्याला सापळा रचून ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखेने अटक केली.



विनायक दामू जिते (रा. कान्हूर मेसाई ता. शिरुर) असे अटक करण्यात आलेल्या सराईत चोरट्याचे नाव आहे. पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, शिरुर, रांजणगाव, खेड परिसरातील मंदिरात चोरी करणाऱ्या चोरट्याला ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखेने अटक केली. चोरट्याने ग्रामीण भागातील ११ मंदिरात चोरी केल्याचे उघड झाले आहे . मंदिरात रात्रीच्या वेळी भाविकांची वर्दळ कमी असते. चोरट्याने मध्यरात्री गुन्हे केले. त्याच्याकडून १ लाख ६३ हजारांचे दागिने, एक लाख १७ हजारांचे चांदीचे मुखवटे, ८० हजारांचे पूजा साहित्य जप्त करण्यात आले. चोरीच्या घटना समोर आल्यानंतर पोलिसांनी मंदिरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले होते. सराईत चोरट्याने चोरी केल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक भाऊसाहेब लोकरे, अमोल वडेकर, संजय साळवे, मंगेश अभंग यांना तो शिक्रापूर परिसरात येणार असल्याची महिती मिळाली. त्यानंतर सापळा लावून त्याला पकडले असल्याची माहिती पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली. अतिरिक्त पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय अधिकारी अमोल मांडवे यावेळी उपस्थित होते.

ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, सहायक निरीक्षक नेताजी गंधारे, अविनाश कालेकर, दत्तात्रय जढर, देवानंद किर्वे, अजित मडके, शांताराम सांगडे, रमेश इचके, संजय साळवे, मंगेश अभंग, चंद्रकांत गव्हाणे, नवनाथ राक्षे, गजानन डाके, ओमनाथ तुमकुटे, राजेश उतळे, विक्रम तापकीर, निलेश सुपेकर, मंगेश थिगळे यांनी ही कारवाई केली, तसेच पोलीस मित्र रामभाऊ वाळुंज, लाखणगाव पोलीस पाटील कल्पना बोऱ्हाडे यांनी तपासात सहाय्य केले.

# शिक्षण संस्थाचालक झाले खंडणीखोर!

## कात्रज येथील अंबरचंदजी मुनोत शिक्षण संस्थेच्या संचालकांवर खंडणीचा गुन्हा दाखल

**पुणे | प्रतिनिधी**

शासकीय अनुदानाची फाईल शिक्षण विभागाकडे पाठवयाची असेल तर प्रत्येकी पाच हजार रुपये तसेच त्यानंतर पुढे निवृत्त होईपर्यंत दरमहा पगाराच्या दहा टक्के रक्कम ही संस्थेस द्यावी लागेल, अशी मागणी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडे करणाऱ्या कात्रज येथील स्व. अंबरचंदजी मुनोत शिक्षण संस्थेच्या संचालकांवर खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




अंबरचंदजी मुनोत शिक्षण संस्था संचालित मुनोत प्राथमिक विद्यालय आणि स्व. सौ. झुंबरबाई मुनोत माध्यमिक विद्यालय या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अशोक मुनोत, सचिव निखील मुनोत, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी हर्षदा मुनोत, माध्यमिक शाळा मुख्याध्यापिका सुरेखा सुतार आणि प्राथमिक शाळा मुख्याध्यापिका उल्का नवगिरे यांच्याविरुध्द भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मागील १० ते १२ वर्षांपासून शारीरिक, मानसिक आणि आर्थिक पिळवणूक आरोपींनी केल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. या प्रकरणी ज्ञानोबा साधू सराटे (वय - ३५ वर्षे, व्यवसाय - शिक्षक, रा. गणेश कॉलनी, अंजलीनगर, कात्रज) यांनी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी आरोपींवर भादंवि कलम ३८४, ३४ नुसार गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार आणि त्यांच्या सोबतच्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांना आरोपींनी बोलावून शासकीय अनुदानाची फाईल शिक्षण विभागाकडे पाठवयाची असेल तर प्रत्येकी पाच हजार रुपये द्यावे लागतील असे सांगितले. तसेच पुढे निवृत्त होईपर्यंत दरमहा पगाराच्या दहा टक्के रक्कम ही संस्थेस द्यावी लागेल, अशी मागणी केली होती.

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनने दिलेल्या माहितीनुसार, स्व. अंबरचंदजी मुनोत शिक्षण संस्थेच्या मुनोत प्राथमिक विद्यालय आणि स्व. सौ. झुंबरबाई मुनोत माध्यमिक विद्यालय अशा दोन शाळा आहेत. सदर दोन्ही शाळा आणि संस्था ही कात्रज-कोंढवा रोड, शिवशंभोनगर गल्ली क्रमांक ५ येथे आहे. प्राथमिक शाळेस २०१६ मध्ये २० टक्के, २०१९ मध्ये ४० टक्के तर १ जानेवारी २०२३ पासून ६० टक्के अनुदान मिळू लागले. त्याचप्रमाणे माध्यमिक शाळेस २०१८ मध्ये २० टक्के, २०१९ मध्ये ४० टक्के तर १ जानेवारी २०२३ पासून ६० टक्के अनुदान मिळू लागले आहे. फिर्यादी यांच्यासोबत प्राथमिक शाळेच्या सहशिक्षिका कविता सुधाकर राणे आणि सुप्रिया कृष्णदास मुप्पीडवार यांनी ऑनलाईन पद्धतीने हर्षदा मुनोत यांच्या अकाऊटवर प्रत्येकी ५,००० रुपये असे एकूण १०,००० रुपये ऑनलाईन गुगल पेद्वारे पाठविले होते. त्यानंतर संस्थेने आम्हा शिक्षकांची कागदपत्राची फाईल शिक्षण विभागास पाठविली, असे तक्रारीत म्हटले आहे.

शिक्षण विभागास फाईल पाठविल्यानंतरही फिर्यादी आणि त्यांच्यासोबतच्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांना निवृत्त होईपर्यंत त्यांच्या पगारातील १० टक्के रक्कम ही संस्थेस द्यावी लागेल, असे म्हणून वारंवार जबरदस्ती केली. ही १० टक्के रक्कम दिली नाही नोकरीतून काढून टाकण्याची धमकी दिली. त्यामुळे अनुदानित सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी मिळून शिक्षण विभागाकडे दिनांक १७ मे २०२३ रोजी आणि त्यानंतर वेळोवेळी शिक्षण विभाग तसेच पोलीस विभागाकडे तक्रारी अर्ज दिली. त्याचा राग मनात धरून तसेच १० टक्के रक्कमही दिली नाही म्हणून फिर्यादी आणि त्यांच्या सहकारी सुप्रिया मुप्पीडवार यांना किरकोळ कारण समोर ठेवून पुढे त्यास मोठे स्वरूप दिले आणि नंतर जबरदस्तीने सेवेतून मुक्त केले, असा आरोपही सदर संस्थाचलकांवर करण्यात आला आहे.

माध्यमिक शाळेचे मल्लिकार्जुन वाडेकर यांनाही नोटिसा देऊन निलंबित करून सेवेतून मुक्त करण्याची प्रकिया राबवली जात आहे. संस्थेचे अध्यक्ष अशोकलाल अंबरचंद मुनोत यांनी वेळोवेळी माझ्यासह इतर शिक्षकांना जबरदस्ती करून अशैक्षणिक कामही करून घेतलेली आहेत. तसेच शासनाकडून मंजुर झालेल्या सुट्ट्यांच्या दिवशीही आम्हास कामाला बोलावून आमच्याकडून अशैक्षणिक काम करून घेतल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

फिर्यादी आणि अन्य सहकाऱ्यांनी त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची तक्रार पोलिसांकडे केली आहे. याप्रकरणी अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे साहाय्यकनिरीक्षक समीर शेंडे हे पुढील तपास करत आहेत.